**प्रेस नोट**

जा.क्र.स्था.गु.शा/ प्रेस नोट/ /२०२१
पोलीस अधीक्षक कार्यालय सिंधुदुर्ग
फॅक्स नं. ०२३६२-२२८२०५,
फोन नं. ०२३६२-२२८२०९
दिनांक - ०५/०१/२०२१.

**<u>महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेल्या गुटखा तंबाखूजन्य पदार्थ यांची विक्री करणेचे उद्देशाने अवैध वाहतुक करणा-या इसमांना स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने शिताफिने घेतले ताब्यात.</u>**

जिल्हयात अवैध तंबाखूजन्य पदार्थ गुटखा याचेवर कारवाई करण्याबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. राजेंद्र दाभाडे, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. तुषार पाटील यांनी सर्व पोलीस ठाण्यांना आदेश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने सिंधुदुर्ग जिल्हयातील कुडाळ पोलीस ठाणे हद्दीत अवैध तंबाखूजन्य पदार्थ गुटखा यांची ट्रक क्रमांक KA-22-C-5273 या वाहनातून देवाण-घेवाण होणार असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेला मिळाली होती.

मा. पोलीस अधीक्षक श्री. राजेंद्र दाभाडे, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. तुषार पाटील मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. धनावडे यांनी पोलीस उप निरीक्षक श्री.सचिन शेळके यांचेसोबत पोलीस अंमलदार सुधीर सावंत, प्रविण वालावलकर, प्रकाश कदम, अनिल धुरी ,प्रमोद काळसेकर, रविंद्र इंगळे, ज्ञानेश्वर कांदळगांवकर तसेच पोलीस उप निरीक्षक श्री. शाहू देसाई यांचे सोबत पोलीस अंमलदार रामचंद्र शेळके, अमित पालकर,चंद्रहास नार्वेकर, प्रथमेश गावडे, जयेश सरमळकर, यांची दोन पथके नेमण्यात आली.

सदर दोन्ही पथकाने मुंबई गोवा हायवेवर कुडाळ येथील शेळके ऑटोमोबाईल दुकानासमोर, सायंकाळी 19.00 वाजलेपासून सापळा रचून ठेवलेला होता. त्यानंतर 21.30 वाजता ट्रक क्रमांक KA-22-C-5273 व Tata Tempo (छोटा हत्ती )क्रमांक MH-07-AJ-1556 वरील नमुद दोन्ही वाहने हौदे एकमेकांना जोडून उभी राहीली होती. ट्रकमधील 4

संशयित वस्तूच्या गोण्या टेम्पोमध्ये भरताना दिसून आले. त्याक्षणी वरील दोन्ही पथकाने सदर ठिकाणी जावून तेथे हजर असलेले चार इसमांकडे मालाबाबत चौकशी करुन मालाची पडताळणी केली. त्यामध्ये तंबाखूजन्य पदार्थ गुटखा असल्याचे दिसून आले. त्यामुळे दोन्ही वाहने व त्यामधील संशयित 4 आरोपी यांना ताब्यात घेऊन कुडाळ पोलीस ठाणे येथे आणण्यात आले. त्या ठिकाणी ट्रकची तपासणी केली असता त्यात आणखी 1 गुटखा भरलेली गोणी आढळून आली.

सदर गुन्हयात सहभागी असलेले, आरोपी 1 ) संतोष मनोहर शिंदे, वय-43 रा. पार्वती नगर उद्यमबाग बेळगांव 2) रुपेश विष्णु माने वय 32 रा. जयनगर हिंदलगा बेळगांव 3) दत्ता उर्फ सुशिल गुरुनाथ पडते वय 50 रा. कुडाळ बाजारपेठ मारुती मंदीर शेजारी तालुका कुडाळ 4) रविंद्र गजानन ढवण, वय-42 रा. पावशी ढवणवाडी तालुका कुडाळ यांचेवर अन्न सुरक्षा व मानके कायदा 2006 चे कलम 26(2)(iv) 27(3)(d)(e) सह वाचन कलम 30(2)(अ) चा भंग कलम 59 सह भा. द. वि. कलम 188,273,34 प्रमाणे गुन्हा दाखल करुन एकुण रुपये 1,68,340/- किंमतीचा तंबाखुजन्य पदार्थ, गुटखा व 1400000/- रुपये किंमतीचा ट्रक व टॅम्पो जप्त करण्यात आलेला आहे. पुढील तपास कुडाळ पोलीस ठाणे करीत आहेत.

( एस.के.धनावडे )
पोलीस निरीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग

प्रति,

मा. जिल्हा माहिती अधिकारी
सिंधुदुर्ग